Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ९, अंक १०] गुरूवार, एप्रिल ६, २०२३/चैत्र १६, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ६२.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २०.

### प्रशासक तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून

**उमरखेड शहराच्या प्रारूप विकास योजनेमधील बदलांच्या सूचीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रसिध्दीकरण.**

### सूचना

क्रमांक नपउ-निवी -०१-२०२३-२४.—

ज्याअर्थी, उमरखेड नगरपरिषदेने नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) नुसार प्रारूप विकास योजना, उमरखेड (मुळ हद्द दुसरी सुधारित) दिनांक ०५ आक्टोबर २०२२ रोजी दै. विदर्भ मतदार व दै. इंडीयन एक्सप्रेस या वृत्तपत्रांमध्ये व महाराष्ट्र शासन राजपत्रात अमरावती विभागीय पुरवणी भाग एक-अ मध्ये दिनांक १३-१९ ऑक्टोबर २०२२ रोजी नागरिकांच्या सूचना / हरकती मागविण्यासाठी जाहीर सूचना प्रसिध्द केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त योजनेवर विहीत मुदतीत प्राप्त सूचना व हरकतींचा विचार करून उक्त अधिनियमांच्या कलम २८ (४) नुसार स्थापन झालेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल उक्त प्राधिकरणाकडे दिनांक १७ फेब्रुवारी २०२३ रोजी सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर विचारांती उक्त नियोजन प्राधिकरणाने, तो अंशतः मान्य करून व नव्याने बदल सूचवुन, उक्त योजनेत बदल करण्यासाठी तो उक्त अधिनियमाच्या कलम ३० नुसार शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यासाठी प्रशासक तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, उमरखेड यांचा ठराव दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी पारीत केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २८ (४) खालील तरतूदीनुसार उक्त योजनेच्या मसुद्यात केलेले बदल नागरिकांच्या अवलोकनार्थ प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, उक्त प्रारूप विकास योजनेच्या मसुद्यात नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २८(४) नुसार केलेल्या बदलांची सूची परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केल्याप्रमाणे, नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर बदल दर्शविणारा उक्त प्रारूप विकास योजनेचा नकाशा खालील नमूद केलेल्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत ३० दिवसाच्या कालावधीकरीता नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला आहे.

## परिशिष्ट " अ "

### महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (४) नुसार केलेल्या बदलांची सूची

| क्रमांक (१) | बदलाचा तपशिल (२) |
|---|---|
| **एम-१** | शेत स.नं. ३३१ मधील उत्तर - दक्षिण १८.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याच्या लगत डाव्या बाजूला आ.क्र. ६ " कम्युनिटी पार्क" करीता आरक्षित असलेली ०.६१ हे.आर जागा प्राथमिक शाळेकरीता आरक्षित करणे.<br>तसेच आ.क्र. ६ " कम्युनिटी पार्क" या आरक्षणाखालील उर्वरीत ३.१६ हे. आर जागा व १२.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याखालील क्षेत्र सदर आरक्षणातून व विकास योजना रस्त्यातून वगळून रहीवासी क्षेत्रात समाविष्ट करणे.<br>(नियोजन प्राधिकरणाने सूचविलेला बदल) |
| **एम-२** | शेत स.नं. ३३१ मधील आ.क्र. ७ " डिस्पेन्सरी व मॅटेर्निटी होम " या आरक्षणाखालील जमीन सदर आरक्षणातून वगळून रहीवासी क्षेत्रात समाविष्ट करणे. |
| **एम-३** | शेत स.नं. ३४० मधील आ.क्र. ११ " हॉकर्स मार्केट व पार्कींग" या आरक्षणाखालील जमीन सदर आरक्षणातून वगळून रहीवासी क्षेत्रात समाविष्ट करणे. |
| **एम-४** | आ.क्र. ०८ " व्हेजीटेबल मार्केट, शॉपिंग सेंटर आणि पार्कींग " या आरक्षणाखालील उत्तरेकडच्या भागाची ०.६७ हे.आर जमीन आरक्षणातून वगळून रहीवासी क्षेत्रात समाविष्ट करणे. |
| **एम-५** | आ.क्र. २२ " शॉपिंग सेंटर" या आरक्षणाखालील जमीन सदर आरक्षणातून वगळून रहीवासी क्षेत्रात समाविष्ट करणे. |
| **एम-६** | आ.क्र. २३ " म्युन्सीपल मॉल आणि पार्कींग" या आरक्षणाखालील जमीन सदर आरक्षणातून वगळून रहीवासी क्षेत्रात समाविष्ट करणे. |
| **एम-७** **एम-७/१** | आ.क्र. ९ " पार्कींग " व आ.क्र. १० " शॉपिंग सेंटर " या आरक्षणाखालील जमीन सदर आरक्षणातून वगळून रहीवासी क्षेत्रात समाविष्ट करणे. |
| **एम-७/२** | उत्तर - दक्षिण १२.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याचे संरेखन पश्चिम दिशेस वळवून सदरच्या विकास योजना रस्त्याखालील जमीन रहीवासी क्षेत्रात समाविष्ट करणे. |
| **एम-७/३** | १२.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याची रुंदी ९.०० करून सदरची उर्वरीत जमीन रहीवासी क्षेत्रात समाविष्ट करणे. |
| **एम-८** | आ. क्र. ३ " शॉपिंग सेंटर" या आरक्षणाचे प्रयोजन बदलून " म्युन्सीपल स्टाफ क्वार्टर" प्रयोजनाकरीता जमीन आरक्षित करणे. |
| **एम-९** | आ. क्र. २५ " शैक्षणिक वापर" या आरक्षणाखालील जमीन सदर आरक्षणातून वगळून रहीवासी क्षेत्रात समाविष्ट करणे. |
| **एम-१०** | १२.०० मी. रूंद विकास योजना रस्ता अंशतः वगळून सदर रस्त्याखालील जमीन रहीवासी क्षेत्रात समाविष्ट करणे.<br>(नियोजन प्राधिकरणाने सूचविलेला बदल) |
| **एम-११** | विद्यमान वन विभागाच्या व सबरजिस्टार कार्यालयाच्या वापराखाली असलेली जमीन " शॉपिंग सेंटर, हॉकर्स झोन व पार्कींग " या प्रयोजनाकरीता आरक्षित करणे. (नियोजन प्राधिकरणाने सूचविलेला बदल) |
| **एम-१२** | सार्वजनिक/निमसार्वजनिक वापराखाली दर्शविलेली जागा आ. क्र. २७ " शॉपिंग सेंटर, व पार्कींग " या आरक्षणाकरीता आरक्षित करणे.<br>(नियोजन प्राधिकरणाने सूचविलेला बदल) |
| **एम-१३** | आ. क्र. २१ " खेळाचे मैदान" या आरक्षणाचे प्रयोजन बदलून " हायस्कूल विस्तार व खेळाचे मैदान" या प्रयोजनाकरीता जमीन आरक्षित करणे. (नियोजन प्राधिकरणाने सूचविलेला बदल) |

**परिशिष्ट " अ "**–चालू

| क्रमांक | बदलाचा तपशिल |
| --- | --- |
| (१) | (२) |
| **एम-१४** | शेत स. नं. १८९ मधील भागशः जमीन आ. क्र. २८" प्राथमिक शाळा" या प्रयोजनाकरीता आरक्षित करणे. (नियोजन प्राधिकरणाने सूचविलेला बदल) |
| **एम-१५** | ९.०० मीटर रूंद विकास योजना रस्ता विकास आराखड्यात दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित करणे. (नियोजन प्राधिकरणाने सूचविलेला बदल) |

१. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उमरखेड, जि. यवतमाळ.

२. सहायक संचालक, नगर रचना विभाग, यवतमाळ.

**महेशकुमार दत्तात्रय जामनोर,**
प्रशासक तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद, उमरखेड.

उमरखेड :
दिनांक ५ एप्रिल, २०२३.

---

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २१.

BY ADMINISTRATOR AND CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

**Publication of list of Changes in Draft Development plan of Umarkhed u/s 28*(4)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

*NOTICE*

No. MCU-PD- 01-2023-24.—

Whereas, Municipal Council, Umarkhed, Dist. Yavatmal being Planning Authority, has published Draft Development Plan of Umarkhed (Original Limit Second Revision) u/s 26*(1)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. *vide* Notice dated 05th October 2022 in daily news paper " Vidarbha Matadar" and "The Indian Express" and in Maharashtra Government Gazette Amravati Divisional Supplement Part I-A, Dated 13-19 October 2022 for inviting suggestions/ objections from public.

And whereas, after considering the suggestions/ objections to the said plan received within stipulated period, the Planning Committee constituted, u/s 28*(4)* of the said Act, has submitted its report to the Planning Authority on 17th Febuary, 2023.

And whereas, the said Planning Authority after considering the report submitted by Planning Committee partly accepted it and also suggested modifications in it and passed Resolution of Administrator and Chief Officer, Municipal Council, Umarkhed, Dated 20th February, 2023 to make modifications to the said plan and to submit the said plan for sanction to the Government u/s 30 of the said Act.

And whereas, it is necessary to publish the said modifications made in the said plan for inspection of the public as per Section 28 *(4)* of the said Act.

Now, therefore the list of modifications made u/s 28*(4)* of the said Act, by the said Planning Authority, is hereby públished as Appendix-A as per provision of the said Act for information of the public. The said Draft Development Plan showing the modifications is kept open for the inspection of the public in the following offices, on working days, during Office hours for the period of 30 days.

APPENDIX - "A"

*List of Modifications Made U/s-28(4) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966*

| Modifications No. | | Details of modifications / changes |
|---|---|---|
| (1) | | (2) |
| | **M-1** | The Land Bearing 0.61 H.A. of S. No. 331 reserved for Site No. 6 "Community Park" on left side along the 18.00 M. wide North-South D.P. Road is Reserved for "Primary School" and rest of the land S. No. 331 reserved for "Community Park" admeasuring 3.16 H. A. and 12.00 M. wide D.P. Road deleted and land so released in included in Residential Zone. (Modification Suggested by Planning Authority) |
| | **M-2** | Site No .7 “Dispensary& Maternity Home” in S. No. 331 deleted and land so released is included in Residential Zone. |
| | **M-3** | Site No. 11 “Hawkers Market & Parking” in S. No. 340 deleted and land so released is included in Residential Zone. |
| | **M-4** | Site No. 8 “Vegetable Markert & Shopping Centre & Parking” (Partly) area admeasuring 0.67 H.A. on Northern Side of site deleted and land so released is included in Residential Zone. |
| | **M-5** | Site No. 22 “Shoping Centre” deleted and land so released is included in Residential Zone. |
| | **M-6** | Site No. 23 “Muncipal Mall & Parking” deleted and land so released is included in Residential Zone. |
| | **M-7/1** | Site No. 9 Parking & Site No. 10 Shoping Centre deleted and land so released is included in Residential Zone. |
| **M-7** | **M-7/2** | North-South Aligment of 12 M. D. P. Road is shifted towards West Side and Land so released included in residential Zone. |
| | **M-7/3** | 12 M. wide D. P. Road width Reduced to 9 M D.P. Road and land so released is included in Residential Zone. |
| | **M-8** | Site No.3 “Shoping Center” is Redesignated as Municipal Staff Quarters. |
| | **M-9** | Site No. 25 “Educational Purpose” deleted and land so released is included in Residential Zone. |
| | **M-10** | 12 M. wide DP Road Partly deleted and land so released is included in Residential Zone. (Modification Suggested by Planning Authority) |
| | **M-11** | The land under use of Forest Office & Sub-Registrar Office is reserved for “Shopping Centre”, Hawkers Zone & Parking. (Modification Suggested by Planning Authority) |
| | **M-12** | The land under Public & Semi-Public Zone is deleted and Reserved for New Site No. 27 “Shopping Centre & Parking”. (Modification Suggested by Planning Authority) |
| | **M-13** | Site No. 21 Play Ground Redesingnated as “Extention to High School & Play Ground.” (Modification Suggested by Planning Authority) |
| | **M-14** | Survey No. 189 Partly is reserved for New Site No. 28 “Primary School” (Modification Suggested by Planning Authority) |
| | **M-15** | 9.00 M. wide D.P. Road Proposed as shown on Development Plan. (Modification Suggested by Planning Authority) |

1. Chief Officer, Municipal Council, Umarkhed, Dist. Yavatmal.
2. Assistant Director, Town Planning Yavatmal.

MAHESHKUMAR DATTATRAY JAMNOR,

Umarkhed :
Daded the 5th April, 2023.

Administrator and Chief Officer,
Municipal Council, Umarkhed.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.